## चित्रपट - गोपालकृष्ण

राधा कृष्ण यांची प्रीती, कृष्णाचे बालपण, गाई आणि गोपाल यांच्याबरोबरचे गोकुळातील दिवस, कृष्णाच्या चमत्कारकथा, कंसाचा नि:पात आणि राधा, गोकुळजन आणि संपूर्ण विश्वाला वेड लावणारी कृष्णाची मधुर मुरली यांनी नटलेले 'गोपालकृष्ण' हे चित्र विशेषत: त्यातील सुमधुर गाण्यांमुळेच लोकप्रिय झाले. प्रशंसा पत्रांचा पाऊस पडला.

गोव्याचे दिगंबरदास कामत नावाचे तत्वज्ञानाचे अभ्यासू यांना 'वंदित राधाबाला' या गाण्यातील "ब्रह्म सानुले हे साकार" हा चरण इतका आवडला की "कवीला कडकडून भेटावे" म्हणून ते गृहस्थ प्रभात मध्ये आले. त्यांनी "राधामातेच्या चरणाची धूळ" म्हणून जेथे चित्रीकरण झाले होते तिथली धूळ कपाळावर लावून घेतली.

## चित्रपट - गोपालकृष्ण

### झर झर झर झर धार झरे

झर झर झर झर धार झरे

धार सुधेची कामधेनूची
भर भर भर भर कलश भरे.

नंदनवन सम गमते गोकुळ
शान्तिसौख्यमय जीवन मंगल

वैभव धन हे अमोल येथिल
धेनु, गोजिरी वासरे.

हरीची मुरली वाजे मंजुळ
प्रमुदित करिते गोकुळ सारे.

## चित्रपट - गोपालकृष्ण

### वंदित राधाबाला, गोपसख्या घननीळा

वंदित राधाबाला, गोपसख्या घननीळा

श्यामल प्रेमळ नंदकुमार
ब्रह्म सानुले हे साकार

जणु स्वर्गीचे सुम सुकुमार
मोहवी परिमळ हृदया, गोप सख्या घननीळा.

करी दुरी पाप हरी, निरसुनि माया
पावन करी जगताला.

## चित्रपट - गोपालकृष्ण

### घास प्रीतीचा

घेई रे सोनुल्या घास प्रीतीचा
राहू दे हासरा चंद्र मुखाचा

हा चिमणीचा, हा मोराचा
हा बघ गोड किती अपुल्या कपिलेचा

घास हा प्रीतीचा वदनी जाऊ दे
पाहू दे विश्वरूप दिव्य त्या मधे

घास हरी जाई एक तुझ्या पोटी
लाभते शांती किती सकल जगाला !

## चित्रपट - गोपालकृष्ण

### हासत नाचत जाऊ, जाऊ चला गोकुळाला

**सर्वजण:**
हासत नाचत जाऊ, जाऊ चला गोकुळाला

**कृष्ण:**
धावत यमुना तीराला
घेउनी गोधनाला
हर्षभरे घुमवीन मी, मृदु मुरली.

**पेंद्या:**
लई येड केलं,
लई येड केलं बासरीनं, पिर्थीविला
जाऊ चला गोकुळाला.

**राधा:**
घालुनि जयमाला, मिरवूया नंदलाला
गाउनी गान, विसरुनि भान
मिरवूया नंदलाला

**सर्वजण:**
हासत नाचत जाऊ, जाऊ चला गोकुळाला

## चित्रपट - गोपालकृष्ण

### शिशुपण बरवे हृदया वाटे

शिशुपण बरवे हृदया वाटे

सुमनची सुमधुर सकल निराशा विलया नेते
जगात जयास तुला न कोठे
शिशुपण बरवे हृदया वाटे.

तुजसम श्रीहरी मित्र असावा
गोड गोड वाजिव पावा
ऐकुनी मानस हासते, नाचते.